## Bachelor of Arts (B.A.) Part–I Examination

## MARATHI (Compulsory)

## Other Language

## (New)

वेळ :— तीन तास] [एकूण गुण :—100

**सूचना :–** (i) **सर्व** प्रश्न सोडवा.

(ii) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

1. भारताचे अमरत्व टिकून राहण्यासाठी काय केले पाहिजे ? असे साने गुरुजी म्हणतात ? 10

किंवा

'दलित जातीत जन्म घेणे हा एक शाप आहे' असे बाबुराव बागूल का म्हणतात ? 10

2. केशवसुतांच्या 'स्फूर्ती' या कवितेचे आशयसौंदर्य स्पष्ट करा. 10

किंवा

'कणा' या कवितेतून जीवनविषयक कोणते तत्त्वज्ञान स्पष्ट होते ? ते सविस्तर लिहा. 10



3. पुढीलपैकी कोणत्याही एकाच गटातील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 100 शब्दात लिहा.

गट 'अ'

(क) 'भक्ता भेटी' या लिळेतून तत्कालीन हिंदू परंपरेचे कोणते पैलू स्पष्ट झाले आहेत ?

(ख) इरावतीबाईंना 'दीपमाळ' असे का म्हंटले आहे ?

(ग) हंस नळराजाच्या तावडीतून आपली सुटका कशी करुन घेतो ?

(घ) जन्ममृत्युबद्दल बहिणाबाईंनी कोणते चिंतन केले आहे ? 20

किंवा

गट 'ब'

(च) लक्ष्मीबाई टिळकांना सासऱ्यांकडून कोणता सासुरवास सहन करावा लागला ? सोदाहरण स्पष्ट करा.

(छ) 'संस्कार' या कथेतील नायकाचे व्यक्तीचित्र रेखाटा.

(ज) ज्ञानेश्वरांनी हरिपाठातून 'नाममहिमा' कसा वर्णन केला आहे ?

(झ) 'या झोपडीत माझ्या' या कवितेची मध्यवर्ती कल्पना स्पष्ट करा. 20

4. पुढीलपैकी कोणत्याही एकाच गटातील प्रश्नांची उत्तरे सुमारे 100 शब्दात लिहा :

गट 'क'

(त) कार्यालयीन कामकाजात मराठीचे महत्त्व स्पष्ट करा.

(थ) 'पुनरावृत्ती' हे संदेश मजबूत करण्याचे साधन कसे ठरते ते स्पष्ट करा.

(द) पत्रलेखनाचे घटक स्पष्ट करा.

(ध) सारांश लेखनाचे महत्व सांगा. 20

किंवा

गट 'ड'

(प) भाषिक संवादव्यवहारातील हेतुमूलकतेचे तत्त्व विशद करा.

(फ) 'पत्र हे संवाद साधण्याचे उत्तम माध्यम आहे' स्पष्ट करा.

(ब) 'भाषांतर ही पुनर्निर्मिती असते' असे का म्हंटले जाते ?

(भ) सारांशलेखनाची उपयुक्तता पटवून द्या. 20

5. खालील सर्व प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :

(i) 'स्वराज्य रक्षण' या पाठाच्या आधारे राजाराम यांच्या कारकिर्दीचा आढावा घ्या.

(ii) 'पूर्णिया' या पाठातील कामगारांच्या जीवनाचे वर्णन आपल्या शब्दात लिहा.

(iii) कवी बा.सी. मर्ढेकर 'भंगु दे काठिण्य माझे' या कवितेतून परमेश्वराजवळ कोणते मागणे मागतात ?

(iv) बालकवींच्या मनातील उदासीनता 'खेड्यातील रात्र' या कवितेतून कशी व्यक्त झाली आहे ? 20



6. योग्य पर्याय निवडा :

(1) 'भक्ता भेटी' ही लिळा या ग्रंथातून घेतली आहे.

(अ) गोविंदप्रभुचरित्र

(ब) लिळाचरित्र

(क) श्री चक्रपाणी चरित्र

(ड) श्रीकृष्ण चरित्र

(2) इरावती कर्वे यांचे माहेर ________ होते.

(अ) विदर्भातले

(ब) खानदेशातील

(क) कोकणातले

(ड) मराठवाड्यातले

(3) रणछोड हा ________ होता.

(अ) ड्रायव्हर

(ब) फोरमन

(क) बॉयलर फिटर

(ड) कंट्रोलर

(4) बिहारमध्ये खाणी आहेत :

(अ) अभ्रकाच्या

(ब) सोन्याच्या

(क) कोळशाच्या

(ड) मँगनीजच्या

(5) माणिकने लेखकाच्या हातात ________ दिल्या.

(अ) सकाळच्या कविता

(ब) दुपारच्या कविता

(क) पहाटेच्या कविता

(ड) संध्याकाळच्या कविता

(6) 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ __________ यांचा आहे.

(अ) ज्ञानेश्वर

(ब) नामदेव

(क) तुकाराम

(ड) एकनाथ

(7) 'घन:श्याम सुंदरा' ही भूपाळी ________ यांची आहे.

(अ) होनाजी बाळा

(ब) राम जोशी

(क) सगनभाऊ

(ड) परशराम

(8) काठोकाठ भरू द्या पेला, फेस _____ उसळू द्या.

(अ) भराभर

(ब) पटापट

(क) सटासट

(ड) गटागट



(9) '__________ सत्त्व लाभु दे भाषा शरीरा' असे बा. सी. मर्ढेकर म्हणतात.

(अ) अनसुयेचे

(ब) सीतेचे

(क) द्रोपद्रीचे

(ड) यापैकी नाही

(10) 'मोडून पडला __________ तरी वाकला नाही कणा.

(अ) व्यवहार

(ब) डोंगर

(क) संसार

(ड) बाजार

(11) __________ मनाच्या व्यवस्थापनाचे शास्त्र आहे.

(अ) भाषण

(ब) वक्तृत्त्व

(क) संवाद

(ड) लिखाण

(12) __________ लेखन करणे हे विशेष लक्षणीय क्षेत्र होय.

(अ) सभा संमेलनात

(ब) साहित्यात

(क) दूरचित्रवाणीत

(ड) नियतकालिकात

(13) __________ हे भाषिक संवाद व्यवहाराचे मूळतत्त्व आहे.

(अ) संभाषण

(ब) हेतुमूलकता

(क) कलाकौशल्य

(ड) संदेश वहन

(14) नातेवाईकांना व मित्र-मैत्रिणींना लिहिल्या जाणाऱ्या पत्रांना ________ म्हणतात.

(अ) औपचारिक पत्रे

(ब) अनौपचारिक पत्रे

(क) व्यावहारिक पत्रे

(ड) खाजगी पत्रे

(15) सारांश लेखन म्हणजे मूळ मजकुराचा _______ करणे होय.

(अ) विस्तार

(ब) संक्षेप

(क) क्रमवारी

(ड) निर्देश



(16) सारांश लेखनाच्या कच्च्या मसुद्याचे _______ करावे लागते.

(अ) काळजीपूर्वक वाचन

(ब) पुनरावलोकन

(क) पुनर्निर्मिती

(ड) क्रमवार मांडणी

(17) कार्यालयीन पत्रव्यवहारात ________ महत्वाचा असतो.

(अ) आवक-जावक क्रमांक

(ब) पृष्ठक्रमांक

(क) नोंदणीक्रमांक

(ड) संदर्भक्रमांक

(18) संवाद हा _________ या इंग्रजी शब्दाचा मराठी पर्याय होय.

(अ) Function

(ब) Communication

(क) Translation

(ड) Motivation

(19) 'मराठी' ही _________ आहे.

(अ) राष्ट्रभाषा

(ब) प्रादेशिक भाषा

(क) आंतरराष्ट्रीय भाषा

(ड) व्यावहारिक भाषा

(20) कार्यालयीन कामकाजात _________ भाषेचा उपयोग होतो.

(अ) अनौपचारिक

(ब) औपचारिक

(क) व्यावहारिक

(ड) बोली 20